# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/विक्रिपरवाना/२०१२/ 690

दि. 2 JUN 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ व अंतर्गत नियम व नियमन २०११.
शासकीय व निमशासकीय कार्यालयामार्फत अन्न पदार्थांची होत असलेल्या विक्री करीता परवाने घेणेबाबत.

संदर्भ :-अन्न व औषध प्रशासन, म.रा.,मुंबई, यांचे पत्र क्र.असुका/विक्री परवाना/ KUM251-12/७ दि. २१ मार्च, २०१२.

अन्न व औषध प्रशासन, म.रा.,मुंबई, यांचे संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्थांना संदर्भांकित पत्रातील निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात यावे. सोबत प्रत जोडली आहे.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

5140
3 JUL 2012

5 JUL 2012

सह संचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद

Contact Numbers :-

A. E. Kerure 09969034272
(Food Safety Officer)

A. S. Rege - 09323343355
(Food Safety Officer)

क्रमांक : असुका/विक्री परवाना/KW/231-12/७
अन्न सुरक्षा आयुक्तालय,
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य.
सर्व्हे क्र. ३४१, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : 29 मार्च, २०१२.
Fax :- 022 - 26591618
022 - 26591959
Tel :- 022 - 26590548
022 - 26592686.

प्रति,

सर्व मा. अपर मुख्य सचिव/
मा. प्रधान सचिव/ मा.सचिव.

विषय :- <u>अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ व अंतर्गत नियम व नियमन २०११.</u>
शासकीय व निमशासकीय कार्यालयामार्फत अन्न पदार्थांची होत असलेल्या विक्री करिता परवाने घेणेबाबत.

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, विषयांकीत कायदयाची अंमलबजावणी दिनांक ०५ ऑगस्ट, २०११ पासून महाराष्ट्रांत सुरु झालेली आहे.

सदर कायदयाचे कलम ३१ नुसार अन्न पदार्थ विक्री करणे, वितरण करणे, साठवणे इत्यादी करिता परवाना घेणे बंधनकारक केलेले आहे. ही कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दि. ०४/०८/२०१२ पूर्वी करणे अपेक्षित असून सध्या कोणत्याही खाद्यपदार्थ विक्रीची सेवा विना परवाना होत असल्यास विषयांकीत कायदयाचे कलम ३१ नुसार गुन्हा घडतो व कलम ६३ नुसार शिक्षा होवू शकते.

याकरिता सर्व खाजगी क्षेत्रातील खाद्यपेये विक्रेत्यांच्याबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या जिल्हास्तरीय कार्यालयाकडून कार्यवाही सुरु आहे.

याकरिता जर आपल्या अखत्यारितील राज्यातील कोणत्याही कार्यालयाच्या आवारात खाद्यपेय विक्री, जसे की कॅन्टीन इ. होत असेल किंवा आपल्या अखत्यारितील हॉस्टेल्स् उदा. शिक्षण विभागांतर्गत असलेले सर्व प्रकारचे विद्यापिठा अंतर्गत असलेली वसतीगृहे/कॅन्टीन्स् इ., आश्रमशाळा, अंगणवाडी, Mid day meal इ. तसेच शासकीय विभागांतर्गत असलेली महामंडळाकडील आस्थापनांमधील इमारतीतील खाद्यपेय विक्रेते (उदा. कॅन्टीन इ.)यांना अतितात्काळ अन्न परवाना/नोंदणी करण्याबाबत बंधनकारक करावे.याकरिता संबंधित जिल्हयातील अन्न सुरक्षा अधिकारी आणि पदनिर्देशित अधिकारी योग्य ती मदत करतील. (याकरिता सुरुवात म्हणून मुंबई आणि ठाणे जिल्हयामध्ये Online सुविधा www.foodlicensing.fssai.gov.in/UserLogin/Login.aspx वर सुध्दा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. )

आपला,

(महेश झगडे) भा.प्र.से.
अन्न सुरक्षा आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन, म. राज्य.

प्रत, —

१) सर्व मा. कुलगुरु.
२) सर्व विभागप्रमुख.
३) सर्व विभागीय आयुक्त.
४) सर्व महापालिका आयुक्त.
५) सर्व जिल्हाधिकारी.
६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
७) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद.

५५६
1/6/12